‘‘स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात 1997 ते 2021 मध्ये सादर झालेल्या मराठी विषयातील पीएच.डी. प्रबंधांचे उल्लेख विश्लेषण’’

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, आंतरविद्याशाखे अंतर्गत ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

शिंदे साईनाथ भानुदास

(M.Lib.&I.Sci., SET.)

मार्गदर्शक

डॉ. पवार जी. आर.

ग्रंथपाल,

शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

संशोधन केंद्र

माध्यमशास्त्र संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

सप्टेंबर 2021

प्रस्तावना :

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची स्थापना महाराष्ट्रातील औरंगाबाद येथील मराठवाडा विद्यापीठाचे विभाजन होऊन 17 सप्टेंबर 1994 रोजी झाली. हैद्राबाद मुक्ती संग्रामातील नेते. शिक्षणतज्ज्ञ स्वामी रामानंद तीर्थ यांच्या कार्यगौरवार्थ त्यांचे नांव या विद्यापीठास देण्यात आले. विद्यापीठाचे स्वरूप संलग्न आणि अध्यापनात्मक आहे. याचे कार्यक्षेत्र नांदेड, लातूर, परभणी व हिंगोली या चार जिल्ह्यांत विस्तारलेले असून 385 महाविद्यालये त्यास संलग्न आहेत. रसायनशास्त्र, वाणिज्य व व्यवसाय प्रबंधन, भूविज्ञान, जीवशास्त्र, गणित व संगणकशास्त्र, शारीरिक शिक्षण आणि सामाजिकशास्त्र या विषयांच्या उच्च शिक्षण देणाऱ्या 13 विद्याशाखा विद्यापीठात कार्यरत आहेत. विविध विषयांच्या पदवी, पदव्युत्तर पदवी, एम. फिल., पीएच.डी. या अभ्यासक्रमांच्या अध्यापनाची व मार्गदर्शनाची सुविधा येथे उपलब्ध आहे. विद्यापीठात सामाजिकशास्त्र संकुल कार्यरत असून महिला अध्ययन केंद्राची येथे स्थापना करण्यात आली आहे. त्याव्दारे महिला सक्षमिकरण आणि महिला कल्याण यासंदर्भातील प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे आयोजन केले जाते. सामाजिक अध्ययन आणि संशोधन यांसाठी विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्र आहे. विद्यापीठाने आदिवासी जमातींच्या जीवन आणि संस्कृतीच्या अभ्यासासाठी किनवट येथे आदिवासी संशोधन केंद्र स्थापण्याचा प्रस्ताव केला आहे. विद्यापीठात आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्र असून येथून जगभरातील विद्यार्थी उच्च शिक्षण प्राप्त करतात. विद्यापीठांतर्गत 32 संशोधन केंद्र कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे विद्यापीठामध्ये भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुलाची स्थापना 2000 मध्ये करण्यात आली असून या संकुलामध्ये मोठ्या प्रमाणात संशोधन होत आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ हे महाराष्ट्रातील नामांकित विद्यापीठांपैकी एक विद्यापीठ असुन या विद्यापीठातील पीएच.डी. पदवी मिळविणाऱ्या संशोधकांची संख्या दरवर्षी वाढत आहे. त्याचप्रमाणे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयातील संशोधन करणाऱ्यांचीही संख्या वाढत आहे. तसेच मराठी विषयात पीएच.डी. संपादन करणाऱ्यांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पण मराठी विषयाचे उल्लेख विश्लेषण अद्याप झालेले नाही. या परिस्थितीचा विचार करून भविष्यकाळातील संशोधकांना, मार्गदर्शकांना व इतर संबंधित व्यक्तींना उपयोगी पडेल या हेतुने प्रस्तुत विषयाचे संशोधन करण्याचे ठरविले आहे.

संशोधन विषयाची निवड :

संशोधन विषयाची निवड ही समस्या सुत्रनाने होत असते. एखादा विषय निश्चित करून संशोधन कार्याची सुरूवात केली जाते या हेतुपोटी विषयाची वास्तविकता, सद्यस्थिती अभ्यासने गरजेचे वाटते. माहितीचे स्त्रोत हे खुप मोठ्या प्रमाणात आपणास दिसून येतात. त्यामध्ये विविध विषयांची मासिके, संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रे, पीएच.डी. प्रबंध, पेटंट, प्रमाणके, गॅजेट इत्यादीचा वापर हा माहिती मिळवण्यासाठी खुप मोठ्या प्रमाणात होतो. त्यामुळे प्रस्तुत विषयामध्ये या साधनांचा कितपत वापर झाला आहे व त्या संशोधनाच्या मुख्य बाबी प्रकाश झोतात आणण्यासाठी प्रस्तुत विषयाची वस्तुस्थिती संशोधन कार्याच्या माध्यमातून प्रकट करण्यासाठी ‘‘स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात 1997 ते 2021 मध्ये सादर झालेल्या मराठी विषयातील पीएच.डी. प्रबंधांचे उल्लेख विश्लेषण’’ या विषयाची निवड केली आहे.

बिब्लियोमेट्रिक्स. (Bibliometrics)

‘बिब्लियोमेट्रिक्स’ ही संकल्पैना अगदी अलीकडेच अस्तित्वात आली आहे. ज्ञान आणि माहिती साधनांच्या प्रकाशनात अमर्याद वाढ झालेली आहे. प्रकाशित साहित्य ग्रंथालयांना संपादन करतांना आर्थिक अडचण भासते. यांचा विचार करता ग्रंथ संग्रहाच्या व्यवस्थापनाच्या कार्यात वाढ झाली. यामुळे गेल्या 50 वर्षात ग्रंथालय व माहितीशास्त्रात एक वेगळा दृष्टिकोण पुढे आला. यामुळे ग्रंथालयात येणारे ग्रंथ आणि ग्रंथेत्तर साहित्यात झालेल्या विशिष्ट विषयाचा प्रकाशन विस्तार, लेखकांच्या संदर्भ निर्मितीच्या रीती, लेखकांचे लेखनातील उत्तरदायित्व ग्रंथालयाचा उपयोग करण्याची कार्य पध्दती आणि त्यामुळे त्यांच्या निर्माण होणाऱ्या माहितीविषयक गरजा या सर्वाचा संख्यात्मक अभ्यास इ.स. 1948 पासून मोठ्या प्रमाणावर करण्यात आला. संशोधनाच्या या प्रक्रियेतून काही नवीन सिध्दांताची निर्मिती झाली. ब्रॅडफर्ड यांनी मांडलेला विषय विस्तार सिध्दांताच्या अनुषंगाने ग्रंथालय व माहितीशास्त्रात बिब्लियोमेट्रिक्स तंत्राची निर्मिती झाली.

‘बिब्लियोमेट्रिक्स’ (Bibliometrics) म्हणजे ग्रंथमिती किंवा ग्रंथाचे मापन होय. या शब्दाची उत्पत्ती लॅटीन भाषेपासून झाली. हा Biblio आणि Metric या दोन शब्दापासून बनला आहे. Biblio म्हणजे ग्रंथ आणि Metric म्हणजे मापन होये. Biblio + Metrics =

Bibliometrics ग्रंथमिती तर ग्रीक भाषेत ग्रंथाचे मापन होय. 'Bibliometrics' या संज्ञेचा उपयोग सर्वप्रथम ॲलन पीचर्ड यांनी 1969 मध्ये केला. Journal of Documentation मधील आपल्या लेखात त्यावेळी रूढ असलेला ''Statistical Bibliography" या संज्ञेच्या जागी त्यांनी हा शब्द वापरला. त्यांनी लेखात 'Bibliometric' हे प्रकाशित ज्ञानाच्या संख्यात्मक विश्लेषणाचे तंत्र आहे. ती एक माहिती प्रणालीची शाखा आहे असे स्पष्ट केले. परंतु या संज्ञेचा उपयोग आणि प्रात्यक्षिके 19 व्या शतकाच्या शेवटच्या दशकात करण्यात आली. म्हणून इ.स. 1917 मध्ये मी.जे. कोले आणि मी.एन.बी. ॲलेस यांनी 'The History of Comparative anatomy part-1 and Statistical Analysis' मध्ये सांख्यिकीचे विश्लेषण करताना 'Bibliometrics' च्या संज्ञेचा आधार घेतला. त्यात त्यांनी 300 वर्षाच्या सर्वेक्षणावर आधारीत विविध देशांच्या या विषयाच्या क्षेत्रातील कार्याचा अभ्यास केला.

उल्लेख विश्लेषण (Citation Analysis)

लेखक स्वतः एखादा लेख लिहीत असतांना आपल्या लेखात दुसऱ्यांच्या लिखित साधनांचा त्याने उपयोगात आणलेल्या, संदर्भ घेतलेल्या इतर माहितीचा उल्लेख करत असतो यालाच Citing किंवा Referencing म्हणतात.

ज्या प्रलेखाचा आपण संदर्भ म्हणून उल्लेख करतो त्यास उल्लेखीत प्रलेख असे म्हणतात तसेच ज्या प्रलेखात उल्लेख केला जातो. त्याला उल्लेखणारे प्रलेख असे म्हणतात. उल्लेख करणारा लेखक आणि उल्लेखीत लेखक किंवा ज्या प्रलेखात उल्लेख झाला तो प्रलेख आणि उल्लेखीत प्रलेख यांच्यातील संबंधाचा अभ्यास म्हणजे उल्लेख विश्लेषण होय.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

कोणतेही संशोधन कार्य करीत असतांना संशोधक काही उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवून संशोधन कार्य करीत असतो. संशोधनाला योग्य दिशा मिळावी, संशोधन हे हेतुपूर्ती करणारे असावे असे अपेक्षित असते. यासाठी संशोधकाने प्रस्तुत संशोधनाची खालील उद्दिष्ट्ये निर्धारीत केलेली आहेत.

1. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात सादर झालेल्या मराठी विषयातील पीएच.डी. प्रबंधांचे कालक्रमानुसार यादी तयार करणे.
2. मराठी विषयातील पीएच.डी. प्रबंधांचे विषयानुसार वर्गीकरण करणे.
3. संदर्भ सूचीमध्ये उपयोग केलेल्या पध्दतीचा शोध घेणे.
4. संशोधनामध्ये उपयोग केलेल्या विविध प्रकारच्या माहिती साधनांचा शोध घेणे.
5. उध्दरणामध्ये अधिक उपयोग करण्यात आलेल्या प्रलेखांचा शोध घेणे व त्यांची क्रमवारी (Rank) तयार करणे.
6. प्रबंधामध्ये उध्दरणाचा विस्तार ब्रॅडफर्ड यांच्या सिध्दांताप्रमाणे होतो काय ते तपासणे.
7. उध्दरणात उपयोगात आलेल्या नियतकालीकांचा शोध घेणे व क्रमांक (Rank) निर्धारीत करणे.

गृहितकृत्ये :

गुड आणि हॅट – गृहितकृत्ये म्हणजे असे विधान आहे, की ज्याची सप्रमाणता ठरविण्यासाठी परीक्षण केले जाते आणि ते पुढील संशोधनासाठी उपयुक्त असते.

गृहितकृत्ये ही संशोधनाचा केंद्रबिंदू मानली जातात. संशोधन करण्यापूर्वी जी संभांव्य उत्तरे गृहित धरली जातात त्यास गृहितकृत्ये संबोधले जाते. गृहितकृत्ये ही संशोधनाला गती देण्याचे काम करतात. म्हणून संशोधन विषयानुसार ही निश्चित केली जातात. त्यामुळे प्रस्तुत संशोधनाची खालील गृहितकृत्ये मांडली आहेत.

1. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात सादर झालेल्या मराठी विषयातील पीएच.डी. प्रबंधांचे ग्रंथसुचीय विषयाप्रमाणे वर्गीकरण झालेले नाही.
2. मराठी विषयातील संशोधनात विविध माहिती संसाधनांचा वापर केला आहे.

3. मराठी विषयातील पीएच.डी. प्रबंधांच्या उध्दराणांचा विस्तार ब्रॅडफर्ड यांच्या सिध्दांताप्रमाणे झालेला आहे.
4. मराठी विषयातील पीएच.डी. प्रबंधांमध्ये नियतकालिकांचा व प्रकाशित साहित्याचा उपयोग केला आहे.

संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :

संशोधनासाठी जो विषय निवडला जातो त्या विषयाची व्याप्ती व मर्यादा निश्चित करावी लागले. संबधित संशोधन विषय हा कोणत्या क्षेत्रापुरता मर्यादीत आहे. याची माहिती द्यावी लागते. या अनुषंगाने प्रस्तुत संशोधन विषय हा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड या विद्यापीठापूरता मर्यादीत आहे. विद्यापीठात 1997 ते 2021 मध्ये सादर झालेल्या मराठी विषयातील पीएच.डी प्रबंधांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी वर्णनात्मक व सांख्यिकी पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. स्वा.रा.ती.म.विद्यापीठात 1997 ते 2021 या काळातील सादर झालेल्या मराठी विषयातील पीएच.डी. प्रबंधांचे ग्रंथसूचीय विवरण देणारे 6' X 4' या आकाराचे पत्र तयार करण्यात येईल व संगणकाचा वापर करून एक्सेल आज्ञावलीत माहिती भरून विश्लेषण करण्यात येईल.

नमुना निवड :

सामाजिकशास्त्रातील एक अविभाज्य भाग म्हणुन नमुना निवड पध्दतीचा उल्लेख केला जातो. विस्तृत समुहाचा लघू प्रतिनिधी म्हणजे नमुना निवड होय. अभ्यासाचे क्षेत्र व स्वरूप लक्षात घेऊन नमुना निवड तंत्राची निवड केली जाते. नमुना निवड पध्दतीमुळे वेळ, श्रम, पैसा, याची बचत होत असते. वस्तुनिष्ठ पध्दतीमुळे व प्रातिनिधिक स्वरूपात नमुना एककाची निवड केली जाते. प्रस्तुत संशोधनाकरीता इ.स. 1997 ते 2021 या काळातील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात सादर झालेल्या मराठी विषयातील पीएच.डी प्रबंधांचा समावेश असेल.

तथ्य संकलन :

तथ्य संकलन हे संशोधनकार्यातील एक महत्वाचे व प्राथमिक कार्य आहे. सामाजिक संशोधनात समस्यांचे निर्धारण झाले, की मग संशोधकाला त्या समस्यांविषयी संबधित तथ्ये, माहिती व सामुग्रीचे संकलन करावे लागते. तथ्य संकलनाकरीता प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर केला जातो. या अनुषंगाने संशोधनाकरीता प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात येईल. प्राथमिक स्त्रोतांमध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात 1997 ते 2021 मध्ये सादर झालेल्या मराठी विषयातील पीएच.डी. प्रबंधांचे निरीक्षण पध्दतीव्दारे तथ्य संकलित करण्यात येईल. दुय्यम स्त्रोतांमध्ये संदर्भग्रंथ, नियतकालिके, वृत्तपत्रे, इंटरनेट इत्यादींचा आधार घेतला जाईल.

पुर्व साहित्याचा आढावा :

संदर्भ साहित्याचा आढावा हा जुन्या साहित्याचा नव्या संदर्भात अभ्यास करण्यासाठी उपयुक्त असतो. त्यामुळे संशोधकाला नव्या जगातील नवी परिस्थिती लक्षात येते. अभ्यास विषयाकडे नव्यादृष्टीने पाहता येते. संशोधनासाठी घेतलेला नवीन विषय प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या पुर्वी झालेल्या संशोधनाशी निगडीत असतो. त्यामुळे संशोधनकर्त्याने निवडलेल्या विषय क्षेत्राशी संबधित साहित्याचे वाचन व मनन हा संशोधनातील एक महत्त्वाचा भाग असतो.

1. काळबांडे आणि सोनवणे (2012)

   डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये 2000 ते 2010 या कालावधीत सादर केलेल्या प्रबंधांचे उल्लेख विश्लेषण केल आहे.

2. Mishra, Gawade आणि Solanki (2014)

   1975 ते 2007 या कालावधीतील इंग्रजी विषयात सादर केलेल्या प्रबंधांचा बिब्लिओमेट्रिक्स अभ्यास केला आहे.

3. Singh आणि Bebi (2014)

   लायब्ररी हेरॉल्ड या नियतकालिकातील 2003 ते 2012 या कालावधीतीत प्रसिध्द झालेल्या लेखांचा बिब्लिओमेट्रिक्स अभ्यास केला आहे.

4. Singh आणि Chander (2016)

इंडियन जर्नल्स ऑफ ट्रॅडिशनल नॉलेज या नियतकालिकातील 2009 ते 2014 या कालावधीत प्रसिध्द झालेल्या लेखांचा बिब्लिओमेट्रिक्स अभ्यास केला आहे.

5. श्रीनिवास मेघश्याम आठल्ये (2018)

मुंबई विद्यापीठात भाषा विभागात सादर केलेल्या प्रबंधांचे उल्लेख विश्लेषण केले आहे.

6. मुरलीधर एस. हेडावू (2014)

रा.तु.म.नागपूर विद्यापीठामध्ये (1984 ते 2008) सादर मराठी वाङ्मय शोध प्रबंधाचे उल्लेख विश्लेषण केले आहे.

संशोधन आराखडा :

रसेल ॲक ऑफ यांच्या म्हणण्यानुसार ज्या बाबी प्रत्यक्षात उतरावयाच्या असतात त्या अवतरण्यापूर्वीच त्यासंबंधी निर्णय घेण्याची प्रक्रिया म्हणजे संशोधन आराखडा होय.

संशोधनाच्या उद्दिष्टाच्या दृष्टीने निष्कर्षाची संबंध्दता व संशोधनकार्यातील मितव्यय यांची जेणेकरून सांगड घालता येईल, अशा प्रकारे तथ्यांचे संकलन व विश्लेषण करण्यासाठी आवश्यक अशा अटींची नियोजित व्यवस्था म्हणजे संशोधन आराखडा होय. संशोधन आराखड्याचे प्रत्येक संशोधनात विशेष महत्व आहे. संशोधन आराखड्या शिवाय वस्तुनिष्ठ संशोधन करणे अशक्य आहे. म्हणुन संशोधन विषयाच्या अनुषंगाने संशोधन आराखडा निश्चित केला जातो. प्रस्तुत संशोधनाचा आराखडा किंवा रूपरेषा खालील प्रमाणे आहे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रकरण दुसरे : पुर्व साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे : संशोधन पध्दती

प्रकरण चौथे : तथ्यांचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रकरण पाचवे : सारांश, निष्कर्ष व मार्गदर्शक सुचना

संदर्भ ग्रंथसुची :

1. पाटील वा. भा., (2018) 'संशोधन पध्दती' प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव.
2. आगलावे प्रदिप, (2020) 'सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे' श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर.
3. सातारकर एस. पी. (2004) 'संशोधन ग्रंथालय' य.च.म.मु.विद्यापीठ, नाशिक.
4. कायंदे पाटील गंगाधर वि. (2009) 'संशोधन पध्दती' चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक.
5. सोनकांबळे बी.जी.,बुरडे एस.बी. (2014) 'सामाजिक संशोधन पध्दती' राऊत पब्लिकेशन, नांदेड.
6. कोण्णुर एम.बी. (2000) 'ग्रंथालय व माहितीशास्त्र कोष' डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
7. थोरात लक्ष्मण (2007) 'ग्रंथालय माहितीशास्त्र' डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
8. कुंभार राजेंद्र (2013) 'ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन' युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे.
9. देशपांडे के.ना. (2005) 'नविन काळाचे शिक्षण तत्वज्ञान' मन प्रकाशन, नाशिक.
10. शेटकर गणेश (2005) 'भारतीय शिक्षणाचा इतिहास' मृण्मयी प्रकाशन, औरंगाबाद.
11. रिसवडकर म. रा. (2005) माहिती संकलन, विश्लेषण आणि सादरीकरण. य.च.म.मु.वि. नाशिक.
12. Bellis, De Nicola (2009) 'Bibliometrics and citation analysis : from the science citation index to cybermetrics' Scarecrow press.
13. Pritchard A. (1969) 'Statistical Bibliobraphy an interim Bibliography' New Western Polytechnic school of Librarianship.
14. Narin, Francis et. Al. (1976) Evaluative Bibliometrics the use of Publication and citation analysis in the evaluation of scientific activity' Cherry Hill, New Jercy.
15. Kothari C.R. (2004) 'Research Methodology' New age international pvt. Ltd., New Delhi.
16. https://shodhganga.inflibnet.ac.in/
17. https://nlist.inflibnet.ac.in
18. https://mhrd.ap.gov.in
19. https://onlinelibrary.wiley.com
20. https://en.wikipedia.org/wiki/Higher_education_in_India

21. https://www.ugc.ac.in

22. https://mr.wikipedia.org/wiki

संशोधक

शिंदे साईनाथ भानुदास

(M.Lib.&I.S., SET.)

मार्गदर्शक

डॉ. पवार जी. आर.

ग्रंथपाल,

शिवाजी महाविद्यालय हिंगोली